# आंतरराष्ट्रीय नवदहशतवाद

*प्रा. पंजाब आनंदराव चव्हाण

आंतरराष्ट्रीय दहशतवाद काळपरत्वे बदलत आहे. १९ व्या शतकात साम्राज्यशाहीच्या जोखडातून मुक्त होण्यासाठी स्वातंत्र्य आंदोलनात साम्राज्यवादी राष्ट्राविरूध्द हिंसक कारवाया करून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात होता. असा मार्ग १९ व्या व २० व्या शतकात स्वतंत्र झालेल्या जवळपास सर्वच राष्ट्रात त्याचा स्वीकार स्वातंत्र्य आंदोलनाच्या चळवळीच्या माध्यमातून अंगीकारलेला होता. आर्यलॅन्डच्या स्वातंत्र्यासाठी झालेली दहशतवादी कृत्ये, इटलीच्या एकीकरणासाठी कम्युनिष्ठांनी अवलंबिलेला दहशतवाद भारतात भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सुभाषचंद्र बोस, भगतसिंग, राजगुरू यासारख्या क्रांतीकारकांनी अवलंबिलेल्या कृती ह्या राष्ट्रीय उद्देशासाठी होत्या. त्यामुळे त्या दैदीप्यमान होत्या. अशा कृतीत हिंसकता असली तरी राष्ट्रीय उद्देश असल्याने त्याचे परिणाम राष्ट्रापुरते मर्यादित होते. आंतराष्ट्रीय दहशतवादाने १९५० नंतर विशेषतः नवस्वतंत्र राष्ट्रातील साम्राज्यवाद कोलमडून पडल्यानंतर आलेल्या नवीन राजकीय व्यवस्थेला त्या राष्ट्रातील प्रश्न सोडवण्यात आलेल्या अपयशानंतर निर्माण झालेल्या दहशतीच्या कृती ह्या वैयक्तिक असंतोषाचा परिपाक होत्या. स्वातंत्र्य चळवळीतील हिंसक आंदोलने राष्ट्रीय उद्देशासाठी असले तरी स्वातंत्र्यानंतरची हिंसक आंदोलने मात्र वंशाभिमान, जातीयता, धार्मिक मुलतत्ववाद, आर्थिक मागसलेपण यांचा आधार घेवून उदयाला आलेली आहेत. श्रीलंकेतील एल.टी.टी.ई., अरबराष्ट्रात कार्यरत 'अल कायदा', अमेरिकेतील 'पेट्रियट कौन्सील', वर्णद्वेश वाढविणारी 'आर्यन नेशन्स'ण 'आयडॅहो' या यारख्या दहशतवादी संघटना वांशिक दुराभिमान वाळगतात. भारतातील 'लष्कर ए तोयबा', युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसाम, हिजबूल मुजाहिद या सारख्या दहशतवादी संघटनांचा विचार होतो. ज्या देशात दहशतवादी संघटना जन्माला आल्या त्यांनी त्या देशातून इतरही देशात हातपाय पसरविले आहेत. उदा. एल.टी.टी.ई., लष्कर ए तोयबा, अल-कायदा.

२० व्या शतकात अखेरीस दहशतवादाने खऱ्या अर्थाने आंतराष्ट्रीय स्वरूप धारण केले आहे. दहशतवाद फोफावण्यासाठी ज्या प्रकारे दहशतवादी संघटना कारणीभूत आहेत. त्याचप्रमाणे काही राष्ट्रांनीय जाणीवपूर्वक आंतरराष्ट्रीय दहशतवादाला खतपाणी घालून जोपासले आहे. यामध्ये अलीकडे पाकिस्तान, अमेरिका, अफगाणिस्तान सारखे राष्ट्रे आघाडीवर राहिले आहेत. अमेरिकेने इतर राष्ट्रातील दहशतवादाला वापरून घेण्याचेच काम केले आहे. अमेरिकेने नवसाम्राज्य वादाचा विस्तार करण्यासाठी नव दहशतवादी भूमिका घेतली आहे. त्यासाठी राजकीय दहशतवाद व आर्थिक कोंडीच्या मार्गाने वापर करून जगावर इंग्लंडनंतर एककल्ली साम्राज्यवाद निर्माण केला आहे. अमेरिकेने दहशतवादाचे हे आधुनिक स्वरूप आहे. राजकीय दहशतवाद व आर्थिक कोंडीचा दहशतवादातून अमेरिकेने अनेक राष्ट्राला वेठीस धरले आहे. त्यात भारतासारखे राष्ट्रसुध्दा भरडले आहे. य.दी.फडके यांनी 'राजकीय दहशतवाद' या आपल्या ग्रंथात आंतरराष्ट्रीय दहशतवादाला अनेक प्रकारात विभागले आहे. त्यांच्या मते "आंतरराष्ट्रीय दहशतवाद्यांनी सामान्य माणसाच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण केली आहे. एका निरपराध माणसाला ठार मारू न हजारोंच्या मनात दहशत निर्माण केली जात आहे. हे दहशतवादाचे सुत्र झालं आहे. सत्तेतील सरकार हे दहशतवाद्यांचे लक्ष नसले तरी सामान्य माणसात भीतीचे वातावरण निमार्ण करून सरकार कडून फायदे उपलब्ध करून घेणे हा राहिला आहे."[१] याबाबत भारतातील कंदाहार येथे विमान अपहरण करून भारत सरकारला कुविख्यात दहशतवाद्याला सोडून देण्यास भाग पाडले आहे. आंतरराष्ट्रीय दहशतवादाने आज जगातील कोणताही देश मुक्त राहिला नाही. "९४ देशांना दहशतवादाने हैराण केले आहे. जगातील आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटना सुध्दा नव्या आधुनिक तंत्राचा वापर करून आपला प्रभाव वाढवित आहेत. विशेषतः प्रसिध्दीतंत्रांचा यथा योग्य वापर करून अनेक दहशतवादी संघटना प्रसारमाध्यमाचे लक्ष आपल्याकडे वेधून घेत आहेत. त्यामुळे अलीकडे वाईट हीच बातमी चांगली बातमी समजली जात आहे. प्रसार माध्यमं चांगली व वाईट अशी दोन्ही बातमी देणे बांधीलकी मानस असल्याने प्रसिध्दीसाठी दहशतवादी संघटना कोणता प्रकार अवलंबतील याचा आता नेम राहिला नाही."[२] विमान अपहरण, प्रसिध्द व्यक्तीचं अपहरण, बँक दरोडा, बॉम्ब स्फोट अशा खळबळजनक घटना दहशतवादी घडवून आणीत आहेत. याचा तपास लावणे राष्ट्राच्या आवाक्याबाहेर जात आहे.

आंतरराष्ट्रीय दहशतवादाच्या उदयाबाबत अनेक मतमतांतरे आहेत. परंतु वाढती लोकसंख्या आणि बेरोजगाराची संख्या हे त्यातील प्रमुख कारण असले तरी आधुनिक जगातील भांडवलशाहीने लोकांच्या वाढविलेल्या अमाप गरजा आणि त्या गरजापुर्तीसाठी जाहिरातीच्या माध्यमातून लोकांच्या मनात बिंबविलेली वेगवेगळ्या आकर्षक आधुनिक वस्तुची बाजारपेठ अशा वस्तुची खरेदी करण्याचे स्वप्न बेरोजगांरांना पाडून त्यांच्यात गरजाच्या मागणीची सुप्त भावना वाढविली जात आहे. प्रचंड आर्थिक विषमतेतून बेरोजगारीचे वैफल्य आलेल्या तरुणाचा ओघ पध्दतशीरपणे दहशतवादी गटाकडे ओढला जात आहे. असे बेरोजगाराचे तांडे दहशतवादी संघटनाचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थाकडे वळत आहेत. शस्त्र चालवण्याचे दहशतवाद्यांना प्रशिक्षण देणाऱ्या संस्था अनेक देशात कार्यरत आहेत. पाकिस्तान, अफगाणीस्तान या सारख्या राष्ट्रात अशा

* दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर, ता. भोकर, नांदेड

संस्था क्रियाशील असल्याचे सिध्दही झाले आहे. आंतरराष्ट्रीय दहशतवादात एक देश दुसऱ्या देशातील सरकार आणि जनतेविरूध्द दहशतवादी कारवाया करतात. त्यांची व्याप्ती अनेक देशाशीही असते. भारतात जम्मु काश्मिर राज्यातील पाकीस्तानी लोकांचा दहशतवाद किंवा ओसामा बिन लादेन यांच्या 'अल कायदा' या दहशवादी संघटनेने सुरु केलेल्या युरोप, आशिया आफ्रिका खंडातील अनेक राष्ट्रातील दहशतवादी कारवाया त्याचे उदाहरण म्हणून सांगता येईल. आंतरराष्ट्रीय दहशतवाद्यांचे कार्यक्षेत्र आधुनिक काळात एका देशापुरतं मर्यादित राहिलं नाही. कार्यक्षेत्र जसे व्यापक झाले आहे, तसेच त्याची परिणाम कारकताही वाढली आहे. 'अल कायदा' संघटनेने इस्लामिक मुलतत्ववादाला प्रोत्साहन देवून इस्लामिक राष्ट्राबरोबरच जगात पसरलेल्या इस्लाम धर्मियांना अमेरिकेविरूध्द जिहादसाठी आकर्षित केले आहे. इस्लाम विरूध्द ख्रिश्चन असा नवा धार्मिक सांप्रदायवादी दहशतवाद जगात वाढण्याची चिन्हे त्यामुळेच दिसत आहेत. धार्मिक दहशतवादामध्ये ज्या देशात ज्या धर्मियांची संख्या जास्त आहे. त्या देशातील बहुसंख्यांक धर्मियाविरूध्द अल्पसंख्यांक धर्मियांचा संघर्ष वाढत आहेत. उदा. भारतात हिंदू विरूध्द मुस्लिम, इस्त्राईलमध्ये ख्रिश्चन विरूध्द इस्लाम अशी दहशतवादी संघर्षाची नवी केंद्र निर्माण होत आहेत. आंतरराष्ट्रीय दहशतवादाची सुरूवात खऱ्या अर्थाने १९४५ नंतर सुरू झालेल्या शीत युध्दानंतर झाली असे मानण्यात येते. "अमेरिका व रशियाने जगातील अनेक राष्ट्रातील दहशतवादी गटांना शस्त्रास्त्रे पुरवून, प्रशिक्षण देवून आणि फरारी दहशतवाद्यांना आश्रय देवून जागतिक स्तरावर दहशतवादास प्रायोजित केले होते. त्यांच्या या भूमिकेत दोन देशातील स्पर्धा होती. अरब देशातील दहशतवादी संघटनांना रशियाने आश्रय दिला. पूर्व युरोपातील कम्युनिष्ट देश, क्युबा, उत्तर कोरिया मध्यपूर्वेतील लिबिया, इराण, सीरीया, इराक, दक्षिण येमेन या राष्ट्रातील दहशतवादी संघटनांना १९९० पर्यंत शस्त्रे, पैसा, आश्रय सोव्हिएत युनियनने दिला. अमेरिकेतील सी.आय.ए.मार्फत, के.जी.बी. मार्फतही दहशतवाद्यांना पैसा, प्रशिक्षण, आश्रय दिला जातो."[३]

आंतरराष्ट्रीय दहशतवादात अलीकडे आण्विक दहशतवादाने खळबळ उडवून दिली आहे. अण्वस्त्र निर्मितीसाठी लागणारे युरेनियम, प्लुटोनियम दहशतवादी संघटनाचे लक्ष झाले आहेत. विमान अपहरण, शस्त्र, लढाई, बॉम्ब स्फोट यापेक्षा भयावह व दुरगामी परिणाम करणारे आण्विक शस्त्रे दहशतवाद्याच्या हाती लागले तर जगाचे होणारे नुकसान भरून न निघणारे आहे. आण्विक दहशतवादाबद्दलची धोक्याची घंटा जगाच्या मानगुटीवर येवून बसली आहे. राष्ट्रातील अणुशक्ती केंद्र, अणुभट्या, दहशतवादी संघटनांच्या लक्ष ठरल्या तर जगाचा विध्वंस घडून येईल. १९९० च्या दशकापासून आंतरराष्ट्रीय दहशतवाद्यांनी जंतू युध्दाचा, रासायनिक युध्दाचा अवलंब करण्यास सुरूवात केली. १९९५ पूर्वी दहशतवादी कमीत कमी माणसांना ठार करून जास्तीत जास्त दहशत निर्माण करीत होते. परंतु १९९५ नंतर मात्र यात बदल झाला आहे. १९९५ मध्ये माणसांच्या मज्जातंतूना नष्ट करणाऱ्या सरिन वायुचा वापर जपान मध्ये एका दहशतवादी अनुयायांनी केला. "दहशतवादी अनेक रासायनिक वायुचा वापर करीत आहेत. त्यामध्ये रायसिन जे एरंडाच्या बीयापासून तयार केले. अत्यंक घातक वायु, येर्सिनिया पेस्टीस नावाच्या सुक्ष्म जंतुमुळे प्लेग होतो. याचाही वापर दहशतवादी करीत आहेत. सेमटेक्स वायु, नायट्रोग्लिसरीन याचाही वापर दहशतवाद्यांनी केला आहे. ४०० डॉलर्स खर्च करून चार हौशी दहशतवाद्यांनी १९९३ मध्ये न्युयॉर्क मधील जागतिक व्यापार केंद्रात स्फोट घडवून आणला. ज्यामुळे ५५ कोटी डॉलर्स दुरूस्तीस लागले. अशा दहशतवादी कृती परिणामाच्या स्वरूपात भयावह आहेत. आधुनिक नवदहशतवादाने ए.बी.सी. तंत्राने ए म्हणजे आण्विक, बी म्हणजे आयॉलॉजिकल (जैविक) आणि सी म्हणजे केमिकल (रासायनिक) अस्त्रे वापरून अंगीकारण्याचा प्रयत्न केला तर अत्यंत अवघड अशी स्थिती सगळ्याच राष्ट्रासमोर उभी ठाकणार आहे. दहशतवाद्यांनी ए.बी.सी. चा वापर केला तर मानव प्राण्यांचा अंत जवळ आला असेच म्हणावे लागेल."[४]

**निष्कर्ष** : आंतरराष्ट्रीय दहशतवादाने जगात असुरक्षितता निर्माण केली आहे. जगातील सगळ्याच राष्ट्रातील सरकारे, अस्थिर होण्याची भिती निर्माण झाली आहे. आंतरराष्ट्रीय दहशतवादाने आपली व्याप्ती प्रचंड प्रमाणात वाढविली आहे. आंतरराष्ट्रीय दहशतवादाला धार्मिक मुलतत्ववादाचा मुलामा चढवून धार्मिक आधारावर दहशतवादी सामान्याचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. आंतरराष्ट्रीय दहशतवादामुळे धार्मिक संघर्ष वाढण्याची भिती निर्माण झाली आहे. दहशतवादी कारवासाची ठिकाणं मानसांची गर्दी असलेली ठिकाणं त्याच बरोबर आर्थिक केंद्र असलेली ठिकाणं सुध्दा झालेली आहेत. आण्विक दहशतवादाचा वापर होण्याची भीती निर्माण झाल्याने जगातील कोणतेही राष्ट्र दहशतवादापासून मुक्त राहणार नाही. कमी माणसे ठार करून जास्त दहशत पसरविण्याचे दहशतवादाचे जुने तंत्र मागे पडत आहे आणि दहशती पसरविण्यासाठी जास्तीत जास्त हिंसक मार्ग स्वीकारण्याचा कल आंतरराष्ट्रीय दहशतवादात दिसून येतो आहे. उदा.११ सप्टेंबर २००१ च्या अमेरिकन वर्ल्ड ट्रेड सेंटर व पेंटागॉन कार्यालयावरील हल्ल्यात हजारो लोकांचा गेलेला बळी हेच दर्शवितो. दहशतवाद्यांना प्रशिक्षण, पैसा व आश्रय देणे जगातील राष्ट्रांनी सोडुन देणे आवश्यक झाले आहे.

**उपाययोजना** : दहशतवादाविरूध्द लढण्याची लढाई प्रत्येक राष्ट्रामधून हाती घेणे आवश्यक झाले आहे. जागतिक लोकमत दहशतवाद विरोधी बनविणे आवश्यक आहे. विशेषतः मुस्लिम राष्ट्रातील मुस्लिमांची मानसिकता दहशतवाद विरोधी बनविणे आवश्यक आहे. अमेरिकेच्या एककल्ली साम्राज्यवादी दहशतवादाला उत्तर देण्यासाठी आशिया व आफ्रिका राष्ट्रांनी एक होवून अलिप्तवादी धोरणाचा पुरस्कार जोरकस करणे आवश्यक आहे. अमेरिकेच्या भूलभूलैय्या भांडवलशाहीला व आर्थिक अरेरावीचा प्रतिकार करण्यासाठी जागतिक लोकमत बनविणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय दहशतवादाला पायबंद घालण्यासाठी बेरोजगाराचे वैफल्य, नैराश्य थांबवणे आणि त्यासाठी शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक नितीमत्तेला प्राधान्य देणे गरजेचे आहे.

## संदर्भ ग्रंथ

1. राजकीय दहशतवाद, य.दी. फडके पान 7, 2. कित्ता- पान 8 3. शोधयात्रा, संपा, डॉ. सुनिता धर्मराव 4. महाराष्ट्र राज्यशास्त्र लोकप्रशासन परिषदेची संशोधन पत्रिका विचारमंथन दहशतवाद मार्च अप्रिल 2002